# मे. हिमालया टर्पेन्स प्रा.लि., जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर या कंपनीचे प्रस्तावित कृत्रिम सेंद्रिय रसायन निर्मिती प्रकल्पाच्या विस्तारीकरणाविषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त

केंद्रीय वने, पर्यावरण व हवामान बदल विभाग, भारत सरकार यांचे पर्यावरण आघात मूल्यांकन (इ.आय.ए.) अधिसूचना २००६, दि. १४/०९/२००६ आणि आतापर्यंत सुधारित अधिसूचनेच्या तरतुदीनुसार मे.हिमालया टर्पेन्स प्रा.लि., गट क्र.२२७, २२८ व २३१, जामघर, पोस्ट नेहरोली, ता.वाडा, जि. पालघर, महाराष्ट्र यांचे प्रस्तावित "कृत्रिम सेंद्रिय रसायन निर्मिती प्रकल्पाचे (एकूण उत्पादन क्षमता १६४७६ टन प्रतिवर्ष, ५(फ) अ श्रेणी) विस्तारीकरणाबाबत" पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीसाठी मुख्यालयाकडे दि.०६.०२.२०२६ रोजी सादर केला होता. त्या अनुषंगाने सदर उद्योगाची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्याकरिता मा.सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) यांनी No./MPCB/JD(WPC)/ENV-PH/B-260212-FTS-०१३५ दि. १२.०२.२०२६ या पत्रान्वये यांचेकडे उप-प्रादेशिक कार्यालय म.प्र.नि. मंडळ कल्याण-३ यांना जनसुनावणीची प्रक्रिया चालू करण्याबाबत आदेश दिले. तद्नंतर मा. सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) मप्रनि, मुंबई यांचे पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-260316-FTS-0149, दि. १६.०३.२०२६ अन्वये उप-प्रादेशिक कार्यालय कल्याण-३ या कार्यालयास पर्यावरण विषयक जाहीर जनसुनवणी घेण्याचे आदेश देण्यात आले होते. सदर प्रकल्पाचे प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी खालील अधिकाऱ्यांच्या पॅनेलची नियुक्ती करण्यात आली.

१) **अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर** — **अध्यक्ष**
किंवा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी दर्जाच्या कमी नाही असे त्यांचा प्रतिनिधी

२) **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी** — **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण

३) **उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३** — **संयोजक**

सदर निर्देशानुसार मा.जिल्हाधिकारी, पालघर यांच्या मान्यतेने जाहीर जनसुनावणीचे अध्यक्ष मा.श्री.सुभाष भागडे, अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०.०४.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. मे. हिमालया टर्पेन्स प्रा.लि., गट क्र.२२७, जामघर, पोस्ट नेहरोली, ता.वाडा, जि. पालघर येथे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीची जाहीर सूचना सुनावणीच्या एक महिना आधी दिनांक ०७.०३.२०२६ रोजी मराठी दै. सकाळ व इंग्रजी दैनिक द फ्री प्रेस जर्नल या वर्तमानपत्रामध्ये जाहीर सूचना प्रकाशित करण्यात आली होती. पर्यावरण आघात मुल्यांकनाचा अहवाल व कार्यकारी सारांश यांच्या प्रती मराठी व इंग्रजी भाषेमध्ये खालील ठिकाणी सर्वांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आले होते.

१. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा माळा, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, दक्षिण मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, तिसरा मजला, शिव (पूर्व), मुंबई- ४०० ०२२.
४. मा.जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर जिल्हा
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर
६. उप विभागीय अधिकारी, ता. वाडा, जि. पालघर
७. प्रादेशिक अधिकारी कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कल्याण

८. तहसिलदार, वाडा तहसिल कार्यालय, जि. पालघर
९. गट विकास अधिकारी, पंचायत समिती वाडा, ता. वाडा, जि. पालघर
१०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर, जि. पालघर
११. ग्रुपग्रामपंचायत कार्यालय-जामघर-लखमापूर पो. नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर

तसेच वर्तमानपत्रातील जाहीर सूचनेद्वारे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचा मुळ उद्देश, प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस सदर प्रकल्पाविषयी माहिती, प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा यांची माहिती सामान्य जनतेस देणे, त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे, याबाबबत परिसरातील नागरिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ यांनी प्रकल्पाबाबत आक्षेप, सूचना लेखी अथवा तोंडी स्वरुपात अथवा ई-मेलद्वारे कळवाव्यात असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रकल्पाबाबत प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, कल्याण येथे २ सूचना ई-मेलद्वारे प्राप्त झाल्या होत्या. (प्रत सोबत)

मे. हिमालया टर्पेन्स प्रा.लि.,या उद्योगाचे पर्यावरण विषयक जनसुनावणी मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांच्या उपस्थितीत दि. १०.०४.२०२६ रोजी दुपारी ०३.१७ वा. सुरु करण्यात आली. सदर सुनावणीस लोकप्रतिनिधी, उद्योगाचे प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, वृत्तपत्र/ वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी व परिसरातील सामान्य नागरीक असे एकूण ५० प्रतिनिधी उपस्थित होते, याबाबतची यादी सोबत जोडलेली आहे. तसेच या जनसुनावणीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१. मा.श्री.सुभाष भागडे, अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर
२. श्री. जयवंत हजारे, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण
३. डॉ.सीमा उ दळवी, संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३

संयोजक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांच्या परवानगीने जनसुनावणीबाबत प्रस्तावना सादर केली आणि प्रकल्प प्रवर्तकास प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक तांत्रिक बाबींसंदर्भात पॉवरपॉईंटचे सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यानुसार प्रकल्प प्रवर्तक यांनी मे. हिमालया टर्पेन्स प्रा.लि., गट क्र.२२७, २२८ व २३१, जामघर, पोस्ट नेहरोली, ता.वाडा, जि. पालघर यांचे प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाचे पॉवरपॉईंट (पी.पी.टी.) सादरीकरणासह तपशिलवार माहिती सर्वांच्या निदर्शनास आणून दिली.

तद्नंतर मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, कंपनीच्या प्रकल्प प्रवर्तकाने तपशिलवार सादरीकरण केले असून यापूर्वी ग्राम पंचायत कार्यालयास सादर केलेला प्रकल्प अहवालाचा कार्यकारी सारांशाचे सर्व उपस्थित नागरिकांडून वाचन केले असे मी समजतो असे म्हटले. दर सारांश आणि कंपनीने दिलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने उपस्थित जनसमुदायास सदर प्रकल्पाबाबत कोणाला काही सूचना, हरकती, प्रश्न उपस्थित करावयाचे असतील तर त्यांनी मांडण्यासाठी मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांच्याकडून आवाहन करण्यात आले. तथापि, एका नागरिकांने घेतलेली हरकत/सूचना दूसऱ्या नागरिकांकडून वारंवार उपस्थित होणार नाहीत याची काळजी घेण्यात यावे असेही सूचना दिले. तसेच जनसुनावणी दरम्यान लेखी सूचना द्यावयाच्या असतील तर म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीकडे दाखल करण्यास सांगितले. इतिवृत्त अंतिम झाल्यानंतर त्याची एक प्रत ग्रामपंचायत कार्यालयास देण्यात येईल आणि म.प्र.नि.मंडळाच्या वेब साईटवर देखील ते प्रसिध्द करण्यात येईल असेही मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सांगितले.

त्यानुसार खालीलप्रमाणे उपस्थितांकडून सूचना, हरकती, प्रश्न उपस्थित करण्यात आले व त्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकाने सविस्तर अभिप्राय दिले :-

१) **श्री.जनार्दन रघुनाथ ठाकरे, शेतकरी, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर-** माझं घर १०० मिटरवर आहे. कंपनीमध्ये यापूर्वी स्पोट झाला होता, कंपनीला आग लागली होती. याबाबत कंपनीकडे काहीही उपाय योजना नाही, सर्व जनता आल्यानंतर आग अटोक्यात आली. आग जर अटोक्यात आली नसती तर जवळपासची आमची घरं उध्वस्त झाली असती ? कंपनीत कधीही स्फोट होऊ शकतो त्यामुळे माझ्या जिवितास धोका आहे. तसेच माझ्या जागेतून कंपनीला रस्ता दिला, अद्यापपर्यंत मला कंपनीने मोबदला दिलेला नाही.

संयोजक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आली आहे असे सांगितले.

२) **श्री. किरण माधव भोये, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर-** श्री. जनार्दन ठाकरे यांच्या प्रश्नाला कंपनीकडून उत्तर देवून दुसरा प्रश्न घ्यावा अशी विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी म्हटले की, कंपनीकडून दिलेल्या आराखड्यामध्ये लाल रेषा दिसते तेथे अग्नीशमनची व्यवस्था करण्यात आलेली असून कंपनीत आग लागल्यावर ती शमवण्याची व्यवस्था कंपनीकडे उपलब्ध आहे.

३) **श्री.जनार्दन रघुनाथ ठाकरे, शेतकरी, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर-** आमच्या जमिनीचा विषय आहे त्यास अनुसरुन उत्तर देण्यात यावे असे सांगितले.

कंपनीचे प्रतिनिधी यांनी सांगितले की, भूसंपादनाच्या विषयाबाबत शासनामार्फत सर्व्हे करुन सर्व काही केले असून आवश्यक कागदपत्र आपणांकडे जमा केले आहेत. कोणाचेही पैसे द्यावयाचे बाकी नाही.

४) **श्री. किरण माधव भोये, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर-** ३० फुटाचा रस्ता कंपनीला दिलेला होता, कंपनीकडून तो रस्ता वाढवून पाहिजे म्हणून मागणी केली याला सरपंच, पोलीस पाटील आणि ग्रामपंचायत सदस्य जामीनाने ठराव करुन तो रस्ता दिलेला होता, याचा मोबदला आपण दिलेला नाही त्याकरीता मी तो रस्ता कधीही बंद करु शकतो याची नोंद घ्यावी असे सांगितले.

मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, ही पर्यावरण विषयक जनसुनावणी असल्याने पर्यावरण विषयक जे प्रश्न आहेत फक्त तेच सांगावेत इतर प्रश्न आपआपसात मिटवू शकता असे म्हटले. तसेच कंपनीतील आगीवरील नियंत्रणाबाबत आवश्यक ती नोंद घेण्यात येईल असे म्हटले.

५) **श्री.जनार्दन रघुनाथ ठाकरे, शेतकरी, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर-** ग्रामपंचायतीचा ठराव करुन जागा दिले असल्यामुळे मी ग्रामपंचायतीला प्रश्न विचारतो असे म्हटले.

मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच वगैरे कोणी येथे उपस्थित आहेत काय? असे विचारले.

६) **श्री. सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर** — जनसुनावणीबाबत ग्रामपंचायतीत नोटीस प्रसिध्द केलेली आहे. श्री.जनार्दन ठाकरे हे आमच्या गावचे असून त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळाला पाहिजे असे आमचे मत आहे. त्याबाबत काय कारवाइ करायचे हे तुम्ही ठरवू शकता. तसेच श्रीमती प्रमिला पंढरीनाथ मोकाशी यांचा एक अर्ज ग्रामपंचायतीकडे आलेला आहे. ज्या दिवशी कंपनीला आग लागली त्याच्या दूसऱ्या दिवशी काही ग्रामस्थानी विनंती अर्ज दिला की, कंपनीमध्ये कोणती घटना घडली

त्यामुळे आग लागली आणि ती विझविण्यात कंपनीला यश आले, त्याबद्दल शंका नाही. त्यानंतर ग्रामपंचायतीकडून भविष्यात अशी घटना पुन्हा होऊ नये यासाठी कंपनीकडून पर्यायी व्यवस्था काय केली आहे अशी नोटीस दिलेली असून आजपर्यंत कंपनीकडून उत्तर आलेले नाही. त्याला लागूनच दूसरा प्रश्न श्रीमती प्रमिला मोकाशी यांना उभे राहून मांडावे असे म्हटले.

७) **श्रीमती प्रमिला पंढरीनाथ मोकाशी, जामघर, पो. नेहरोली, ता.वाडा, जि. पालघर** — मी विधवा महिला आहे. माझी लागवडीची जमीन कंपनीच्या खालच्या बाजूला असून माझ्या जमिनीत काहीही लागवड करु शकत नाही, प्रचंड वास येतो, आमचे नुकसान होते. गेल्यावर्षी बाजुच्या कंपनीतून आम्लयुक्त पाणी आल्यामुळे जमिनीतील गवत मरुन गेली व भातशेती खराब झाली, आंब्याची लागवड केली त्या झाडावर कोळश्याचा काळा थर बसतो, गेल्या वर्षी भात शेतीची लागवड करताना पायाला जळजळ झाल्यामुळे दुसऱ्या दिवशी कोणीही कामाला आले नाही, विहिरीतून बुडबुड असा वाफ येतो. सर्व्हे नं. २१४ व २१५ मध्ये आमची जमीन संपादित केलेली आहे. त्यामुळे कंपनीच्या परवानगीस आमची मान्यता नाही असे सांगितले.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आली आहे असे सांगितले. तसेच ही पर्यावरण विषयक जनसुनावणी असल्याने पर्यावरण विषयक मुद्दे मांडावेत अशी पुन्हा विनंती केली.

८) **श्री. सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर** — प्रश्न पर्यावरणाचाच असून कुठलाही संबंध नसताना कंपनीने शेतकऱ्याची जागा संपादित केली, २१४ व २१५ ची ७/१२ त्यांच्या नावावर आहे ती जागा घेतली आणि त्याच्यावर कंपनीने बांधकाम केले, जागा एफ एस आय मध्ये वापरली गेली, एफ एस आय वापरल्यानंतर हरितपट्टा कसा काय तयार केला? बाजूच्या शेतकऱ्यांच्या कब्जेवहिवाटीतील रस्ता हरितपट्टा दाखविलेला आहे त्याची कशी काय गणना एकूण क्षेत्रापैकी होऊ शकते? दूसरी गोष्टअशी की कंपनीच्या बाजूला असलेल्या शेतकरी भगिनी यांच्या जमिनी लागून असल्यामुळे सांडपाणी अथवा घनकचरा मुळे शेतीचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी दिल्या, भातशेती लावायला शेतात कामगार आले त्यांच्या पायाला खाज आणि पुरळ आली त्यामुळे त्या दूसऱ्या दिवशी कामाला आले नाही, हे जलप्रदूषणाचे परिणाम आहेत. तसेच ग्राम पंचायतीला ज्या ज्या तक्रारी आल्या आहेत त्याचे निराकरण करणे व्यवस्थापनाचे काम आहे असे सांगितले व समाधान कारक निराकरण करुनच पुढच्या प्रश्नाकडे जावे अशी विनंती केली.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी ग्राम पंचायतीकडील तक्रारीची नोंद घेण्यात येईल असे सांगून प्रकल्प प्रवर्तकानी उत्तर द्यावे असे म्हटले.

कंपनी प्रतिनिधी यांनी मराठी व्यवस्थित समजत नसल्याने ऐकण्या बोलण्यामध्ये काही चुकभूल झाल्यास क्षमा करण्यात यावे असे म्हटले. कंपनीमध्ये पुर्णपणे हरियाली असून झिरो लिक्वीड डिसचार्जची व्यवस्था केल्यामुळे कंपनीबाहेर एक थेंबही पाणी जाणार नाही याची काळजी घेण्यात येईल असेही म्हटले.

९) **किरण माधव गोळे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** — हरियाली बद्दल भाष्य केले तर कंपनीकडून लावलेले ८० झाडे अस्तित्वात आहेत काय? यांच्याकडे आहेत काय हे बघून घ्यावं असं विचारणा केले.

कंपनी प्रतिनिधी यांनी सांगितले की, पावसाळ्यात ८० झाडे लावले आहेत.

१०) **किरण माधव गोळे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** — पावसाळ्यात झाडे लावली आहेत आणि आता अस्तित्वात नाही ही निव्वळ दिशाभुल आहे.

अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी प्रश्न विचारणे तुम्ही उत्तर देणे या पेक्षा १०, १५ किंवा २० किती झाडे आहेत ते सांगावे जेणेकरुन इतिवृत्तामध्ये वस्तुस्थितीची नोंद घेऊन पुढे जाणे शक्य होईल असे सांगितले.

कंपनी प्रतिनिधी यांनी पावसाळ्यामध्ये नर्सरीमधून झाडे खरेदी करुन लावण्यात आल्याबाबतची पावती कंपनीकडे असल्याचे आणि भविष्यातही कंपनीकडून झाडे लावण्यात येतील असे सांगितले.

११) **श्री.सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर** – कंपनी प्रतिनिधींने सांगितले की, आम्ही झाडे लावली हे सरासर खोटे आहे मी याचा पुरावा देऊ शकतो. कंपनीने ग्राम पंचायतीला झाडे उपलब्ध करुन देण्याबाबत पत्र दिले होते. कंपनीच्या आजुबाजुचे लोक ग्रामपंचायती कडे तक्रारी करतात की, या कंपनीत काय तयार होते, की ज्यामुळे आमची शेतीचे नुकसान होते. या कंपनीमध्ये कशाची निर्मिती होते व टाकाऊ कचरा निघतो हे पहायचे आहे, याकरीता ग्राम पंचायतीकडून १० वेळा विनंती केली होती व नोटीस दिली होती, पोस्टाद्वारे पत्र पाठविले होते. परंतु आमची विनंती त्यांनी मान्य केली नाही व आम्हाला आतमध्ये येऊ दिले नाही. ही जनसुनावणी ठेवल्यामुळे या कंपनीत कृत्रिम सेंद्रीय रसायनाची निर्मिती होणार आहे हे आता आम्हाला समजते. माझी विनंती आहे की, ही जनसुनावणी आताच तहकुब करण्यात यावी.

कंपनी प्रतिनिधींनी कंपनीत आग लागल्यावर आपण आला होता तेंव्हा मी पूर्ण कंपनी फिरुन दाखविली होती असे म्हटले आणि काही चुकभुल झाली असेल तर माफी असावी असे विनंती केली.

१२) **श्री.सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर** – आपल्या कंपनीतील आगीबाबतची बातमी मिडीयामध्ये आली, कंपनी विवादात अडकली तेंव्हा गावातील लोकांना त्रास होऊ नये यासाठी ग्रामपंचायत स्वत: कंपनीच्या मदतीला धावून आली, त्यावेळी तुम्ही कंपनी दाखविली, आमच्यासोबत काही ग्रामस्थही होते. ग्रामपंचायत कंपनीच्या विरोधात आहे हे गैरसमज ठेवू नका. मी स्वत: इंजिनिअर असून आपली इक्वीपमेंट इन्सुअर्ड आहेत का हे सुध्दा विचारले होते. तुम्हाला कंपनी चालवयाची आहे पण ते करतांना पर्यावरणाची हानी होऊ नये असे सर्वांचे ध्येय असले पाहिजे. आपल्या कंपनीमध्ये जे पाणी वापरले जाणार आहे ते कोठून आणणार आहात असे प्रश्न विचारले.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीसाठी आवश्यक असणारी पाणी भुपृष्ठावरील म्हणजेच बोअरवेल मार्फत उपसा करुन घेण्यात येईल.

१३) **श्री.सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर** –शासनाच्या नियमानुसार कमाल १८० फुटापेक्षा जास्त खोल बोअरवेल घेता येत नाही. गावामध्ये ग्राम पंचायतीकडून यंत्रामार्फत पाण्याची पातळी पाहून ८ बोअरवेल मारले असता, पहिले ३ दिवस पाणी आले नंतर पाण्याचा साठा संपला. कंपनीकडे पैसे असल्यामुळे ४०० फुट बोअरवेल मारु शकतात, परंतु गावातील लोकांकडे पैसे नाहीत. यावर आमच्याकडे पर्यायसुध्दा उपलब्ध असून गावातील तलावातील गाळ काढा, विहिरीच खोलीकरण केलं तर गावातील लोकांना पाणी पुरतील एवढं पाणी साठवता येईल. चांगला पर्याय निघत असेल, गावकऱ्यांच्या पाण्याचं प्रश्न मिटत असेल तर आम्ही १०० टक्के कंपनीच्या पाठी उभे राहू.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी वरील आक्षेप व सूचना यांची नोंद घेण्यात येईल असे सांगितले.

१४) **श्री. विश्वजित रा. गोळे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर**- प्रकल्पासाठी माझी ५ गुंठे जागा दिलेली असून त्यापुढील अजून ३ गुंठे जागा माझी आहे त्यानंतर गट नं २२७ आहे. मी कधीही खोदून रस्ता बंद करु शकतो, रस्ता नसेल तर कंपनी चालू शकते काय? तुम्ही परवानगी कशी देणार? उलट कंपनीने माझ्यावर कोर्टात केस टाकलेली आहे. त्यासाठी यांना अगोदर सर्व्हे करायला सांगा सुनावणी स्थगित करा आणि नंतर पुन्हा सुनावणी घ्या असे सांगितले. त्याबाबत तहसिलदार, प्रांत यांच्याकडे तक्रार केले आहे, कोर्टात पण गेलेलो आहे. परंतु कंपनीकडून पोलीस स्टेशनमार्फत माझ्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न होत आहे.

अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी वरील हरकतीची नोंद घेण्यात येईल असे सांगितले तसेच आतापर्यंत झालेले विषय वगळून आणखी कोणाला काही सांगावयाचे आहे काय सांगावे असे म्हटले.

१५) **श्री./श्रीम. सीमा सांबरे, सरपंच, जामघर-लखमापूर ग्रुप ग्रामपंचायत, ता. वाडा, जि. पालघर** – ही कंपनी सन २०१९-२० पासून येथे आलेली असून त्यांनी ग्रामपंचायतीचा कोणतेही कर वारंवार नोटीस पाठवूनही अजूनपर्यंत भरलेले नाही. कर न भरल्यामुळे लोकांना ग्राम पंचायतीकडून सोयी सुविधा देण्यात अडचण येत आहे. त्यांना पत्र व्यवहार करुनही उत्तर दिलेले नाही याचे उत्तर देण्यात यावे ही विनंती.

कंपनी प्रतिनिधी यांनी सांगितले की, घरपट्टीचे नोटीस आली असून घरपट्टी सन २०१९ पासून लावण्यात आलेली आहे. परंतु ही कंपनी सन २०२२ पासून सुरु झाली असल्यामुळे घरपट्टी सन २०२२ पासून लावण्यासाठी कंपनीकडून ग्राम पंचायतीला पत्र व्यवहार केला असल्याचे सांगितले. कंपनी घरपट्टी भरण्यास तयार असून ग्रामस्थांचे विकास व्हावा असे कंपनीचे मत आहे.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी घरपट्टी हे विषय पर्यावरणविषयक नाही तरीही कंपनीकडून एक पत्र देऊन विषय सोडवावा असे म्हटले.

१६) **श्री.सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर** –घरपट्टी सुनावणीविषयक असल्याचे सांगून कंपनी गावातील लोकांचे जिवनमान उंचावण्यासाठी, सुधारण्यासाठी येते, जर कंपनी टॅक्स दिला तर ग्रामपंचायत लोकांची सोय करेल त्यामुळे हे एकमेकाशी निगडीत विषय आहेत असे सांगितले. तसेच कंपनीने कब्जा केलेली व वापरात असलेली जागा एफ एस आय मध्ये पकडली जाणार नाही कारण, जागेचा ७/१२ त्यांच्या नावे नाही.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी हे एकमेकाशी निगडीत विषय असले तरी ही पर्यावरण विषयक सुनावणी असल्यामुळे याचा भाग होणार नाही असे सांगितले. ग्राम पंचायत अधिनियमान्वये एखाद्या भोगवटादाराने पैसे भरले नाही तर वसुली करण्याची, सील करण्याची व लिलाव करण्याची तरतुद आहे त्या प्रमाणे योग्य कार्यवाही ग्राम सेवकांनी करावी असे म्हटले. एखादे न्यायप्रविष्ठ प्रकरण असेल तर त्यामध्ये दोघांनाही आपआपले म्हणणे मांडण्याची संधी आहे. त्यामुळे पर्यावरणाशी निगडीत काही विषय असतील तर सांगा असे म्हटले.

१७) **श्री.सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर** –या कंपनीबद्दल आम्ही सगळं सांगूनही आपणांस काही समजले नाही असे वाटते. कंपनीमध्ये काय निर्माण होतं, कच्चा माल काय हे माहितच नव्हतं, येथून निघणाऱ्या वायुमुळे काय परिणाम होणार आहेत हेच आम्हाला माहित नाही. ही सुनावणी ठेवली म्हणून आम्हाला या गोष्टींची माहिती मिळाली. तरी, याबाबत आम्हाला अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात यावा आणि ही सुनावणी रद्द करावी अशी विनंती केली.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी या कंपनीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचनेनुसार ३० दिवस आधी ई.आय.ए. अहवाल देण्यात आला होता, त्यासोबत कन्सेंटची प्रत सुध्दा उपलब्ध करुन दिले असल्याचे निदर्शनास आणले व वरील आक्षेपाची नोंद घेण्यात येईल असे सांगितले.

१८) **श्री. विश्वजित रा. गोळे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** –जमिनीबाबत आम्ही तीन लोक बाधित असून कंपनीकडून शासनाचा सर्व्हे करुन संबंधित विभागाकडून प्रकरण निकाली काढण्यास सांगण्यात यावे अशी विनंती केली. रस्ता नसेल तर कंपनी चालेल काय? अशीही विचारणा केली.

त्यावर संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण- ३ यांनी संबंधित विभागामार्फत तो विषय मार्गी निघेल असे म्हटले व याची नोंद घेण्यात येईल असे सांगितले.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी एम.आर.टी.पी. कायद्याअंतर्गत जिल्हाधिकारी सक्षम प्राधिकारी असल्याने सदर तिघांनी जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज करावे, त्यांना बांधकाम परवानगी वगैरे एम.आर.टी.पी. अंतर्गत दिली जाते तिथे काही घडलं असेल तर त्यांच्यावर चौकशी करुन कारवाई होईल असे म्हटले. वेगवेगळे इतर विषय जनसुनावणीमध्ये घेणे अपेक्षित नाही, तरीही त्याकरीता स्वतंत्र अर्ज सादर केल्यास त्यांना दिलासा देण्यात येईल असे म्हटले.

१९) **श्री. मोहन ठाकरे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** – हिमालयाच्या प्रस्तावित उत्पादन प्रक्रियेमुळे निर्माण होणाऱ्या एकूण कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन एकुण उत्पादनामागे प्रति किलो १.३२६ किलोग्रॅम समतुल्य इतका आहे म्हणजेच खुप जास्त कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन होणार आहे. कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन कमी करण्याचे प्रमाण खुप कमी दाखविले आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, एकूण उत्पादनामागे म्हणजेच कच्चा माल बाहेरुन येतो त्यामध्ये त्याचंही प्रमाण पकडलं जातं, इंधनासाठी कोळसा लागतो, पाणी, वीज हे सर्व मिळून त्याची गणना केली जाते असे सांगितले. हे जनरेट होणारं कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण कमी करण्याचे उपाय देखील केले जातात. त्यासाठी हरित पट्ट्यांचे विकास करणे व सोलर पॅनेल सध्या लावलेले आहेत. एक झाड वर्षाला २० किलो कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतं, १६ हजार टन निर्मिती गृहीत धरतो, पण प्रत्यक्षात त्यापेक्षा कमी होवू शकतं.

मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी पालघर- त्यांना जे म्हणयचं आहे त्याची नोंद घ्या, मंजूरी देणारे सक्षम प्राधिकारी त्याची तपासणी करतील असे म्हटले.

कंपनी प्रतिनिधी यांनी सांगितले की, कच्चा माल तयार होणे, वाहतूक इत्यादी प्रक्रियेमध्ये वातावरणामध्ये उत्सर्जन होणारे कार्बन डाय आक्साईडची याची प्रमाण गणना केली जाते. प्रत्यक्ष कंपनीमध्ये उत्पादन निर्मितीतून इतका कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन होणार नाही. उत्पादन प्रक्रियेमध्ये कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन होत नाही.

२०) **श्री. मोहन ठाकरे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** – इथे किती कार्बन डाय ऑक्साईडच उत्सर्जन होईल हे कळेल काय?

कंपनी प्रतिनिधींनी पर्यावरण मुल्यांकन आघात अहवालात तपशिल दिलेले आहेत याची गणना कशी केली जाते याची प्रत आपणांस दिली जाईल असे सांगितले. जास्तीत जास्त झाडं लावून कार्बन डाय ऑक्साईडचं प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

२१) **श्री. मोहन ठाकरे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** – कंपनीमध्ये अति ज्वलनशिल पदार्थ बाहेर ठेवण्यात येतात, मागच्या वेळी आग लागली ती कशामुळे लागली होती हे सांगू शकता काय? फॅक्टरी इन्स्पेक्टर आले होते त्याचा अहवाल देण्यात यावा असे म्हटले.

कंपनी प्रतिनिधी यांनी सांगितले की, मागच्या वेळी शॉटसर्किट मुळे आग लागली होती, साधारण १२ मिनिटांत आग विझविली होती. सगळे अहवाल म.प्र.नि.मंडळास सादर केले आहेत असे सांगितले. ऑन साईट व ऑफ साईट आपतकालिन अहवाल तयार असून जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केला आहे.

२२) **श्रीमती शितल मोकाशी, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** – कंपनीकडून सादरीकरण दाखविण्यात आलं, त्यामध्ये कंपनीपासून १२ कि.मी. दूर असलेल्या जागेचे, हवेचे मातीचे परिक्षण केले असल्याचं सांगितले. परंतु कंपनीच्या बाजूच्या शेतकऱ्यांच्या काय समस्या आहेत, येथील मातीचं, पाण्याचं आणि हवेचं परिक्षण कराव असं वाटलं नाही का? कंपनीपासून लांब राहणाऱ्या लोकांना समस्या आहेत की, बाजुला राहणाऱ्या लोकांना हे सांगावं. कंपनीच्या बाजूला माझं जमीन असून कंपनीतील पाणी व राख माझ्या जमिनीवर माळरानावर पडते. माझ्या शेतात कलिंगडची लागवड केली होती, ती पुर्ण काळी पडली. ही कंपनी जर अशी चालू राहिली तर थोड्या दिवसात आम्ही येथे राहू पण शकणार नाही, अशा वेळी आम्ही काय करावं असे विचारणा केली.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.मंडळ, कल्याण- ३ यांनी याची नोंद घेण्यात येईल असे नमूद करुन प्रकल्प प्रवर्तकांनी वरीलबाबत उत्तर द्यावे असे सांगितले.

२३) **श्रीमती शितल मोकाशी, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** – कंपनीकडून आतापर्यंत काही झाले नाही आता पुढे काय होईल असे म्हटले. हळुहळु आमच्या जमिनी नापिक होणार आहेत तेंव्हा आम्ही काय करायचं असा प्रश्न केला.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी कंपनीच्या आजुबाजूच्या जमिनीतील मातीचे आणि पाण्याचे नमुने म.प्र.नि.मंडळाकडून जमा करण्यात येईल व आवश्यक कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

२४) **श्री.सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर** –आताच कंपनीचा एवढं त्रास आहे आणि विस्तारीकरणारनंतर उत्पादन वाढवलं तर परिस्थिती वाईट असेल त्यामुळे आताच्या आता ही सुनावणी रद्द करण्यात यावी व तात्काळ स्थगिती देण्यात यावे असे मत मांडले.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी तुमच्या मताची नोंद करुन घेतली आहे, अजून काही विषय असतील तर सांगावे असे आवाहन केले.

२५) **प्रविण मोकाशी, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** – माझ कंपनीच्या बाजूला शेत असून शेतीवरच आमचा उदरनिर्वाह होत आहे. शेती नापिक झाली तर आम्ही काय करावं, तसेच २०० मिटरवर घर, वस्ती व पाडा आहे,

संध्याकाळच्या वेळी खूप आवाज येतो, ध्वनीप्रदूषण होते यावर काय उपाय योजना आहेत ते सांगावे असे म्हटले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी प्रदूषण कमी करण्याबाबत कंपनीकडून दक्षता घेतली जाईल असे सांगितले. पर्यावरण व्यवस्थापन आराखडा हा बनिविण्यात आला आहे.

२६) **डॉ. गिरीष ठाकरे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** – माझं घर १०० मीटरवर आहे, येथे सकाळी रोज एक प्रकारचा उग्र वास पसरतो, तो कशाचा आहे, त्याचे दुष्परिणाम काय आहेत याबद्दल आम्हाला माहिती नाही, याबद्दल माहिती मिळावी असे म्हटले.

२७) **श्री.सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर** –कंपनी बॉयलरचा वापर करणार असून त्यासाठी ब्रिकेट वापरणार आहे, त्यापासून राख तयार होतं, त्या राखेचं विल्हेवाट कशी लावणार आहात? आणि ते त्याचं प्रमाण किती होतं याबाबत तपशिलवार माहिती सांगावं असे विचारले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी ब्रिकेटपासून निघणारं राख विट भट्टीला देणार असून विट कारखान्यांच्या मालकांसमवेत करार केला आहे असे म्हटले.

२८) **श्री.सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर** –गावात विटभट्टीला परवानगीच नाही तर ते राख तुम्ही कोणाला देणार याच स्पष्टीकरण द्यावं. तुम्ही विटभट्टी मालकाबरोबर करार केला असाल पण विटभट्टीचा व्यवसायच अनधिकृत आहे असे सांगितले.

मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी पालघर यांनी कंपनीने कोणाबरोबर करार केले आहे, त्याची माहिती देण्यात यावी असे सांगितले तसेच राखेची संपूर्ण विल्हेवाट लावण्याची जबाबदारी कंपनीची आहे असे म्हटले.

कंपनी प्रतिनिधीनी सदर राखेच्या विल्हेवाट लावण्याची पूर्ण काळजी घेण्यात येईल असे म्हटले.

२९) **श्री.सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, पोस्ट नेहरोली, ता. वाडा, जि. पालघर** –कंपनी राखेच्या विल्हेवाटीची काळजी घेणार-देणार ही नंतरची गोष्ट असून कंपनी सुरु होणार असेल तर त्याचे नियोजन आधीपासूनच असले पाहिजे असे सांगितले. या कंपनीचे जे उत्पादन आहे ते जिवनावश्यक वस्तू नाहीत, सध्या उत्पादन घेतांना कंपनीकडून सर्व नियम पाळले जात नाहीत, उत्पादनामध्ये वाढ झाल्यास प्रदूषण जास्तच होणार आहे. त्यामुळे सध्याचे उत्पादन शून्य प्रदूषण करुन दाखवायला सांगा आणि नंतर सुनावणी घ्या असे म्हटले.

३०) **डॉ. गिरीष ठाकरे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** – माझं कंपनीच्या जवळच घर आहे, कंपनीमध्ये स्टोरोज टाकीमध्ये आग लागल्यास आम्हाला किती धोका आहे?

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, प्रत्येक आस्थापनेला आग नियंत्रणाबाबत लायसन्स दिले जातात, पंरतु चुकुन आग लागल्यास त्याची जबाबदारी कंपनीची असेल. कंपनीकडून अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर कारवाई आवश्यक आहे.

**३१) डॉ. गिरीष ठाकरे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** — कंपनीतील आगीने बाधित होणाऱ्या लोकांच काय होईल अशी विचारणा केली.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, जे काही हरकती, सूचना उपस्थित करावयाचे आहेत त्यांनी करावेत असे एक महिना आधी आवाहन करण्यात आले होते, त्यानुसार २२ सूचना ई-मेल द्वारे प्राप्त झाल्या आहेत. इथेही कोणाला काही लेखी म्हणणे सादर करावयाचे आहेत ते म.प्र.नि.मंडळाकडे सादर करावेत त्यांचा इतिवृत्तामध्ये नोंद करुन सक्षम अधिकाऱ्याकडे पाठविली जाते, त्यानंतर कंपनीला परवानगी मंजूर झाली तर ती परवानगी वेब साईटवर टाकली जाते. त्यानंतर वर्षातून दोनदा १ जूनला आणि १ डिसेंबर ला कंपनीचा अहवाल वेब साईटवर टाकणे बंधनकारक असते.

**३२) श्री.सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** —गावामध्ये सध्या पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरु असून कंपनीला लागणारी मोठ्या प्रमाणातील पाणी बोअरवेल मधून घेणार आहे. पाणी मुलभूत गरज असल्यामुळे ग्रामस्थांच्या पाण्याची सोय झाली पाहिजे.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे भूगर्भामधून बोअरवेल द्वारे कंपनी पाणी घेणार आहे असं कंपनीचं म्हणणं आहे, २०० फुटावर पाणी लागणार नाही असं तुमची शंका आहे त्यांना बोअरवेल तर घेऊ द्यावं.

**३३) श्री.संदिप तुकाराम गोळे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** — कंपनीकडून पर्यावरणाबद्दल आम्ही तुम्हाला झाडं देऊ शकतो असे सांगून मला आंब्याचे २० झाडं, चिकुचे २ झाडं आणि लिंबूचे २ झाडं दिले आहेत ते माझ्या प्लॉटमध्ये आतासुध्दा बघू शकता असे म्हटले. तसेच पाण्याबद्दल काही शेतकऱ्यांच्या विहिरी खोलीकरण करा व ते पाणी तुम्हीही घ्या आणि गावकऱ्यांनाही देऊ शकता असे मत मांडले. मला झाडे दिल्याप्रमाणे सभोवतालच्या परिसरातील शेतकऱ्यांना झाडं उपलब्ध करुन द्या असेही सांगितले.

मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सी.एस.आर. निधी खर्च करणे कायद्याने बंधन कारक आहे त्याप्रमाणे काही करता येईल काय ते पहावे असे निर्देश दिले.

**३४) श्री. महेंद्र गोळे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** — या कंपनीमुळे गावातील १० ते १२ लोकांना येथे रोजगार उपलब्ध झाला, त्याने गावाचा विकास होण्यास मदत होईल असे सांगितले.
त्यावर गावातील बहुतेक ग्रामस्थांनी लोकांची वाट लावून गावाचा विकास होऊ नये, आम्हाला जमिनी नापिक करुन रोजगार नको आहे असे सांगितले.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, सर्व गावकऱ्यांचा मुद्दे लक्षात आलेले असून आवाजाचा त्रास आहे याबद्दल म.प्र.नि.मंडळाकडून तपासणी केली जाईल, काही विषयाबाबत कारवाई करुन उत्तर द्यावं लागेल त्याचं लगेच उत्तर सांगता येत नाही.

**३५) श्रीमती साक्षी गोळे, जामघर, ता, वाडा, जि. पालघर** — झाडे दयायची असेल तर कंपनीमुळे कुणाचे नुकसान झाले आहे त्यांना झाडे दयायची परंतु येथे जमीनीत लागवड होवू शकत नाही झाडे कसे होतील हा

३६) प्रश्न आहे? कंपनीने रोजगार दिले आहे असे सांगितले जाते, माझ्याकडे ३०० महिला बचत गटामध्ये आहेत पण १ महिला कामाला आहे त्या व्यतिरिक्त एकही महिला कामाला नाहीत. महिलांना रोजगार चालू होईल अशी उपाययोजना कपंनीकडून करण्यात याव्यात, तसेच माझा मुलगा इ. १२ वी उत्तीर्ण असून त्याला कामाला लावू शकत नाही. पण कंपनीच्या विश्वासातील व्यक्तींकडील बाजूच्या गावातील अशिक्षित माणसाला रोजगार मिळतो हा गावावर अन्याय आहे. आधीच पाणी टंचाई आहे, लोकांना पाणी नाही अशा परिस्थितीत शासनाच्या नियमाविरुध्द हे २०० फुट खोलीपेक्षा जास्त बोअरवेल कंपनी कसे काय घेऊ शकते. पाणीच नसेल तर महिला काय करेल? कंपनीत गावातील किती महिला व किती पुरषांना रोजगार देण्यात येतो हे सांगाव.

मा. अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी आपल्या मताचं नोंद घेण्यात येईल असे सांगितले.

कंपनी प्रतिनिधी यांनी सांगितले की, कंपनीत जामघर, कुडुस व इतर गावातील कामगार आहेत असे सांगितले.

३७) **श्रीमती साक्षी गोळे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** — ग्रामपंचायत जामघर आहे जामघरचे किती कामगार आहेत ते सांगा असे विचारले व त्यांना समोर आणा असेही म्हटले.

कंपनी प्रतिनिधींनी जामघरचे ३ महिला व २ पुरुष कामगार आहेत असे सांगितले. प्रस्तावित प्रकल्पासाठी जास्तीत जास्त स्थानिक कामगार घेतले जाते.

३८) **जागृती ठाकरे, जामघर, ता. वाडा, जि. पालघर**- या कंपनीला मी वारंवार सांगितले आहे की, तुमच्या कंपनीचा बोर्ड लावा, मोठमोठे ट्रक येतात, आमची आंब्याचं झाडं तोडतात कंपनीने माझ्याकडे कधी चौकशी केली नाही याचा आम्हाला त्रास होतो. आज सुनावणी आहे म्हणून बोर्ड लावण्यात आलेला आहे.

मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी कंपनीला तातडीने बोर्ड लावण्याच्या आणि कोणाचेही झाडं तोडली जाणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना केल्या.

३९) **शिवाजी रा. पाटील, अंबरनाथ** — मी उद्योजक असून सध्या अंबरनाथ येथे रहात आहे. मी या परिसरामध्ये उद्योग घेऊन येतो, एक दोन उद्योजकांनी मला प्रश्न विचारले की, येथे कंपनीमध्ये कशाचे उत्पादन होते, ऑक्सीजनचे पातळी काय आहे व इतर तांत्रिक बाबींची डिस्प्ले बोर्ड नाही आहे त्यावर काय कारवाई करणार आहात?

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.मंडळ, कल्याण- ३ यांनी उद्योगांना डिस्प्ले बोर्ड लावणे अत्यावश्यक असून कंपनीने डिस्प्ले बोर्ड तात्काळ लावावा असे सांगितले.

४०) **शिवाजी रा. पाटील, अंबरनाथ** — कंपनी यापुढे डिस्प्ले बोर्ड लावेल ते ठिक आहे परंतु आतापर्यंत त्यांनी लावले नाही त्यावर काय कारवाई करणार असे विचारले.

४१) **श्री.सचिन पाटील, उपसरपंच, जामघर, ता. वाडा, जि. पालघर** —फॅक्टरी अॅक्ट कायद्यानुसार मराठीत डिस्ल्पे बोर्ड लावणे बंधनकारक असून कंपनी एकही नियम पाळत नाही. तसेच ग्रामस्थांनी दिलेले सर्वच्या सर्व लेखी निवेदन ग्राम पंचायतीमार्फत देतो ते स्विकारावे आणि ही जनसुनावणी स्थगित करावी असे मत व्यक्त केले.

मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी सर्व निवेदने स्विकारुन त्यांना पोहोच देण्यात यावी असे निर्देश दिले.

जनसुनावणीमध्ये लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, ग्रामस्थ, व्यवसायिक सहभागी झाले होते आणि त्यांनी प्रकल्पाच्या संदर्भात अपेक्षा व आक्षेप व्यक्त केले. मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर व जनसुनावणी समितीचे सदस्य, प्रकल्प प्रवर्तक यांचेकडून लोकप्रतिनिधी व गावकरी यांचा पर्यावरणविषयक बाबींचा विरोध, सूचना,

अपेक्षा इत्यादींबाबतची नोंद घेतली आहे. शेवटी मा.अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी शांततेच्या मार्गाने सुनावणीत सहभाग घेऊन आपले मत नोंदविल्याबाबत सर्व उपस्थितांचे आभार मानून जनसुनावणीची प्रक्रिया संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**डॉ. सीमा उ दळवी**
समितीचे संयोजक आणि
उप-प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, म.प्र.नि.मंडळ,

**श्री. जयंवत हजारे**
समितीचे सदस्य आणि
प्रादेशिक अधिकारी, कल्याण, म.प्र.नि.मंडळ

**श्री. सुभाष भागडे**
समितीचे अध्यक्ष आणि
अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर